**<u>प्रेसनोट दिनांक-२५/०९/२०१९</u>**

दिनांक- २४/०९/२०१९ रोजी १९/०० वा. पासुन येरवडा परिसरामध्ये अचानक मुसळधार पाऊस पडण्यास सुरुवात झाली होती. मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे शादलबाबा चौकामध्ये ०२ फुटापर्यंत रस्त्यावर पाणी जमा झाले होते. मुसळधार पाऊसामध्ये ०२ फुटापर्यंत पाणी रस्त्यावर साचलेले असताना देखील पोलीस शिपाई ९१२९ गणेश थोपटे येरवडा वाहतुक विभाग पुणे हे चौकाच्या मध्यभागी उभे राहुन वाहतुक नियमन करुन आपले कर्तव्य बिनचुकपणे पार पाडत होते. त्यामुळे नमुद चौकात कोणत्याही प्रकारची वाहतुक कोंडी झाली नाही व वाहतुक सुरळीत सुरु राहीली.

आर. एस. साठे
पोलिस निरीक्षक
येरवडा वाहतुक विभाग
पुणे शहर



